!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७९ १९-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## मनपा मार्चएण्डपुर्वी साडेतीन कोटी रुपये भरावे - खासदार चंद्रकांत खैरे

### जिल्हा विद्युतीकरण समिती बैठक

संभाजीनगर, दि. २३- मनपाकडे महावितरणची वीजबीलाची १७ कोटी ८८ लाख रुपये थकबाकी असतांना मनपाच्या अधिकाऱ्यांनी १ कोटी रुपये आज भरणा करणार असल्याचे सांगितले. मात्र दरमहा साडेतीन कोटी रुपये देण्याचे तत्कालीन आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी मान्य केलेले असल्याने साडेतीन कोटी रुपये मार्च एण्डपुर्वी भरणा करा असे महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रभाकर निर्मळे यांनी स्पष्ट केले. यावर मनपा अधिकारी निरुत्तर झाल्याने खासदार चंद्रकांत खैरे यांनी मार्चएण्डपुर्वी साडेतीन कोटी रुपये भरणा न झाल्यास मनपाचा वीजपुरवठा तोडा असे निर्देश महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिले.

जिल्हा विद्युतीकरण समितीच्या माध्यमातुन मनपाच्या वीजबील बाबत तडजोडी करुन कोट्यावधी रुपये वाचविण्यात आलेले आहे, याची जाणीव ठेऊन मनपाने वेळेत वीजबील अदा केले पाहिजे अशी भुमिका खासदार खैरे यांनी यावेळी मांडली. त्यामुळे ३१ मार्च पुर्वी मनपाकडुन महावितरणला साडेतीन कोटी रुपयाचा भरणा न झाल्यास मनपावर महावितरणची वीज कोसळणार आहे. या बैठकीला मुख्य अभियंता सतिश चव्हाण, नगरसेवक नंदु घोडले, राजु राठोड, भद्रा मारुती संस्थानचे अध्यक्ष बारगळ, राखी सुरडकर यांची उपस्थिती होती.

जिल्हा विद्युतीकरण समितीची बैठक आज गुरुवारी शिवसेना उपनेते तथा खासदार चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत वीज बीलाच्या थकबाकी संदर्भात मुद्दा उपस्थित झाल्यानंतर कार्यकारी अभियंता पठाण यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या वीजबीलाची थकबाकी मनपाने भरणा केली नसल्याचे निदर्शनास आणुन दिले. यावर मनपाच्या विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी वीजबील भरणा करण्याची जबाबदारी संबधित कंपनीकडे असल्याचे सांगितले. मात्र या सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याऱ्या हॅनीवेल या कंपनीला मनपाने बील अदा केलेले नाही. त्यामुळे कंपनीने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची देखभाल काम बंद केले असुन, वीजबील भरणा केलेला नाही. या बीलात त्रुटी असल्याने याची सध्या चौकशी सुरु असल्याचे मनपाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, सध्या शहरात वीजबीलाची थकबाकी वसुली मोहिम सुरु असल्याने ३१ मार्च पुर्वी ही थकबाकी अदा न झाल्यास सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वीजपुरवठा तोडणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले. परिमंडळ एक व दोन चा भूमिगत केबलिंग करण्याचा प्रस्ताव १५ दिवसात तयार करण्याचे आदेश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिले

शहराच्या सुरक्षेसाठी चौका- चौकात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे वीज बील अदा करण्यात न आल्याने त्याचा वीज पुरवठा तोडण्याचा करण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे. यामुळे शहराची सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे. मनपा आणि हॅनीवेल कंपनीमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे बील अदा करण्यासंदर्भात वाद असल्याने वीजबीलाची थकबाकी ३१ मार्चपुर्वी भरणा होणे अशक्य आहे. त्यामुळे शहरातील चौकाचौकात बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्याची वीजपुरवठा तोडला जाण्याची दाट शक्यता आहे. असे झाल्यास शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525